## महाराष्ट्र शासन

क्रमांक:बीएड-४६१५/प्र.क्र.३३२(२)/मशि-२,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ११ जुलै, २०१६.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
कार्यालय
आवक क्रमांक 2452 दिनांक 19/7/16
जावक क्रमांक 2452 दिनांक 21/7

प्रति,
कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

**विषय:- अशासकीय अनुदानित शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमांस शासनाचे सुधारीत ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत.**

**संदर्भ** :- (१) शासन परिपत्रक क्र.बीएड-४६१५/प्र.क्र.१६२/१५/मशि-२,दि.२१ ऑगस्ट, २०१५ व शासन पुरकपत्रक, समक्रमांक, दि. ०३ ऑक्टोबर, २०१५.
(२) शासन पत्र क्रमांक बीएड. ४६१५/प्र.क्र.३३२/मशि-२, दि.१५.०३.२०१६.
(३) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.उशिसं/२०१५/ प्र.क्र.१६२/१५/बीएड./६०६०, दिनांक ११.०५.२०१६.

National Council for Teachers Education (Recognition, Norms and Procedure) Regulation, 2014 अन्वये राज्यातील अध्यापक महाविद्यालयांना एनसीटीईकडून सुधारीत मान्यतेचे आदेश देण्यात आलेले आहेत. त्याअनुषंगाने संदर्भ क्र. (१) येथील दिनांक २१.८.२०१५ च्या परिपत्रकान्वये व दि.०३.१०.२०१५ च्या पुरकपत्रकान्वये राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद, पश्चिम क्षेत्रिय समिती, भोपाळ तसेच भारतीय पुनर्वास परिषद, नवी दिल्ली यांच्याकडून सुधारीत मान्यताप्राप्त अध्यापक महाविद्यालयांना शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतची कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे. तसेच संदर्भ क्र.२ येथील शासन पत्रान्वये सहसंचालक, उच्च शिक्षण यांच्या स्तरावर स्थापन केलेल्या पथकाने दिलेल्या शिफारशीनुसार संचालक, उच्च शिक्षण यांनी संदर्भ क्र.३ येथील पत्रान्वये राज्यातील शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमांना शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास अनुसरुन सोबत जोडलेल्या परिशिष्टामधील अशासकीय अनुदानित शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमांना (बी.एड.) नमूद विद्यार्थी प्रवेश क्षमतेच्या युनिटना अनुदान तत्वावर चालविण्यास शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून खालील अटींच्या अधीन राहून ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे. तसेच, सदर महाविद्यालयातील उर्वरित तुकडयांना (ज्या अभ्यासक्रमांना (बी.एड./एम.एड.) यापूर्वी शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे) कायम विनाअनुदान तत्वावर चालविण्यास शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून खालील अटींच्या अधीन राहून ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

१) एन.सी.टी.ई.,भोपाळ/आर.सी.आय.,नवी दिल्ली यांच्या मान्यतेच्या पत्राची खातरजमा करण्याची जबाबदारी विद्यापीठाची राहील.
२) एन.सी.टी.ई.,भोपाळ/आर.सी.आय., नवी दिल्ली यांच्या नियमाप्रमाणे अभ्यासक्रमाचे किमान दिवस पूर्ण होतील याची खात्री करुन विद्यापीठाने संलग्नता प्रदान करावी.
३) एन.सी.टी.ई.,भोपाळ/आर.सी.आय., नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या अटींची पूर्तता करण्यात आल्याबाबतची खातरजमा करण्याची जबाबदारी विद्यापीठाची राहील.

| | | | |
|---|---|---|---|
| | | [illegible]<br>आदर्श बहुव्यापी शिक्षण व संशोधन महाविद्यालय, पुणे | प्रमाणपत्र देण्यात येत आहे. |
| | | सुह्द मंडळ शिवाजीनगर, पुणे या संस्थेचे, पी. एस. मुळगांवकर विशेष शिक्षण अध्यापक महाविद्यालय, पुणे | आर.सी.आय.च्या सुधारित निकषांची पुर्तता करण्याच्या अधिन राहून २५ विद्यार्थी प्रति युनिटप्रमाणे **एक** युनिट अनुदानित तत्वावर चालविण्यास शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे. |
| | | श्री शिवाजी मराठा सोसायटी, पुणे या संस्थेचे<br>अध्यापक महाविद्यालय, अरण्येश्वर, पुणे | एनसीटीईच्या सुधारित निकषांची पुर्तता करण्याच्या अधिन राहून ५० विद्यार्थी प्रति युनिटप्रमाणे **एक** युनिट अनुदानित तत्वावर चालविण्यास शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे. |
| | | एस.एन.डी.टी. विद्यापीठ, मुंबई या संस्थेचे, एस. एन. डी. टी. कॉलेज ऑफ एज्युकेशन, पुणे | |
| | | गोखले एज्युकेशन सोसायटी, नाशिक या संस्थेचे<br>शिक्षणशास्त्र महाविद्यालय, संगमनेर, जि.अहमदनगर | एनसीटीईच्या सुधारित निकषांची पुर्तता करण्याच्या अधिन राहून ५० विद्यार्थी प्रति युनिट याप्रमाणे **एक** युनिट अनुदानित तत्वावर चालविण्यास शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे. |
| | | विद्या प्रतिष्ठान, अहमदनगर या संस्थेचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, केडगांव (दे), अहमदनगर | एनसीटीईच्या सुधारित निकषांची पुर्तता करण्याच्या अधिन राहून ५० विद्यार्थी प्रति युनिट प्रमाणे **एक** युनिट अनुदानित तत्वावर चालविण्यास शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे. |
| | | रयत शिक्षण संस्था, सातारा या संस्थेचे, स्वामी सहजानंद भारती शिक्षणशास्त्र महाविद्यालय, श्रीरामपूर, जि.अहमदनगर | |
| ४ | **नागपूर विभाग** | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर या संस्थेचे बॅरि. शेषराव वानखेडे शिक्षण महाविद्यालय, सिव्हील लाईन्स, अमरावती रोड, नागपूर | एनसीटीईच्या सुधारित निकषांची पुर्तता करण्याच्या अधिन राहून ५० विद्यार्थी प्रति युनिट याप्रमाणे **दोन** युनिटअनुदानित तत्वावर चालविण्यास शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे. |
| | | गोंदिया शिक्षण संस्था, गोंदिया या संस्थेचे पुंजाभाई पटेल शिक्षण महाविद्यालय, गोंदिया | एनसीटीईच्या सुधारित निकषांची पुर्तता करण्याच्या अधिन राहून ५० विद्यार्थी प्रति युनिटप्रमाणे **एक** युनिट अनुदानित तत्वावर चालविण्यास शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे. |